सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ६ वे, राजपत्र क्र. ४०] गुरुवार ते बुधवार, ऑक्टोबर १-७, २०२० : आश्विन, ९-१५, शके १९४२ [पृष्ठे - १२,

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

भाग एक–औरंगाबाद विभागीय पुरवणी

अनुक्रमणिका

	पृष्ठे
भाग एक-शासकीय अधिसूचना, नेमणुका, पदोन्नती, अनुपस्थितीची रजा (भाग एक-अ, चार-अ, चार-ब व चार-क यामध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्याच्याव्यतिरिक्त) केवळ औरंगाबाद विभागशी संबंधित असलेले नियम व आदेश.	१०४९ ते १०४९
संकीर्ण अधिसूचना, नेमणुका, पदोन्नती इत्यादी केवळ औरंगाबाद विभागशी संबंधित असलेले.	१०५० ते १०६०
भाग एक-अ (भाग चार-अ मध्ये प्रसिध्द करण्यात आले आहेत त्या व्यतिरिक्त) केवळ औरंगाबाद विभागशी संबंधित असलेले महाराष्ट्र नगरपालिका, जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपंचायती, नगरपरिषदा, जिल्हा नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.	– ते –

शासकीय अधिसूचना, नेमणुका, पदोन्नती इत्यादी

१

By Section Officer,

Government of Maharashtra

Law and Judiciary Department,

Hutatma Rajguru Chowk,

Madam Cama Road,

Mantralaya, Mumbai-400032.

Dated 3rd September, 2020.

No. SPP-2019/U.O.R.54/D-XIV.-- In exercise of the powers conferred by subsection (8) of the section 24 of the Code of Criminal Procedure, 1973 (Act No. II of 1974), the Government of Maharashtra hereby appoints Adv. Sushim B. Wadmare as "Special Public Prosecuter" for conducting the Special Atrocity Atrocity Cases No 02/2015 pending before Session Court, Beed which is arising out of C.R. No. 02/2015 registered with Ashti Police Station, Dist. Beed.

2. The Fees of Adv. Sushim B. Wadmare, Special Public Prosecuter shall be paid by Social Justice and Special Assistance Department as per the proposal approved by this department.

3. His appointment is strictly subject to the conditions of service laid down in the Maharashtra Law officers (Appointment, Conditions of Service and Remuneration) Rules, 1984.

4. The Government Reserves the right to revoke /modify/annul the order without assigning any reason.

By Order and in the name of the Governor of Maharashtra

Vaishali P. Borude,
Section Officer,
Government of Maharashtra.

संकीर्ण अधिसूचना, नेमणुका, पदोन्नती इत्यादी

२

जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था लातूर यांजकडून

वाचा :- १. महाराष्ट्र शासन वटहुकूम नं. १४ दि. १३/१०/१९८१.

२. महाराष्ट्र शासन कृषी सहकार व वस्त्रोद्योग विभाग, मुंबई अधिसुचना क्र. सहिससी/१०८१/३३३२/२२०/१५ सी दि. २१/१०/१९८१

३. मा. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे परिपत्रक क्र.एडीएम/१८४/१५६(२) दि. १९/०३/१९६८.

४. मा. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्यालयाकडील पत्र दिनांक २४/६/२०१६.

५) मा. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे यांचे परिपत्रक दिनांक ०१/०१/२०१७.

६) मा. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे यांचे आदेश दिनांक ०६/०४/२०१८.

७) मा. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे यांचे आदेश दिनांक ०६/०६/२०१९.

८) व्यवस्थापक, इंदीरा महिला नागरी सहकारी बँक लि. लातूर यांचे पत्र दिनांक ०७/०७/२०२०.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ (१) व नियम १०७ अन्वये

आदेश

क्र. वि-२/कलम १५६/इंदिरा महिला सह बँक/१७४५/सन २०. :- महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ (१) अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन **मी, समृत जाधव, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर** या अधिसुचनेद्वारे **इंदिरा महिला नागरी सहकारी बँक लि. लातूर** या बँकेच्या खालीलप्रमाणे नमूद अधिकाऱ्यांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ (१) व (२) आणि महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६१ चे २ (एच) व (जे) तसेच नियम १०७ खालील पोटनियम ३,५,६,७,९,१०,११ (अपसेट प्राईस कायम करण्याची तरतूद वगळून) १२,१३,१५,१५,१७,१८ व २० (अ) नुसार वरील कायद्याचे कलम १०१ अनुसार दिलेल्या वसुली दाखल्याची अंमलबजावणी करण्यासाठी या आदेशाचे दिनांकापासून ते दि. ३१ मार्च २०२१ या कालावधीकरिता अधिकार प्रदान करीत आहे.

सदरचे अधिकार खालील अटीस अधिन राहून प्रदान करण्यात येत आहेत.

अ. क्र.	वसूली अधिकाऱ्याचे नाव	अधिकार प्रदान केलेल्या अधिकाऱ्याचे हुद्दा	शक्तीची व्याप्ती	कार्यक्षेत्र
१.	श्री. आर. डी. साबळे	वसूली अधिकारी	विशेष वसूली व विक्री अधिकारी	बँकेच्या कार्यक्षेत्रापुरते

१. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ अन्वये व नियम १९६१ चे नियम १०७ मधील तरतूदीनुसार कर्ज वसूलीची कार्यवाही करावी.

२. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ अन्वये कर्ज वसूलीचे अधिकार केवळ महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ व ९१ अन्वये प्राप्त झालेल्या वसूली प्रमाणपत्रांच्या अंमलबजाणीकरिता असतील.

३. प्रस्तुत व्यक्तीची बदली, सेवा निवृत्ती, मृत्यु झाल्यास प्रदान केलेले अधिकार आपोआप रद्द होतील.

४. या कार्यालयास उपरोक्त अधिकार मागे घेण्यास हक्क राहील.

५. विशेष वसूली अधिकारी यांनी नमूद केलेल्या कालावधीत वसूलीचे कामकाज समाधानकारक केले नसल्याचे निदर्शनास आल्यास तसेच प्रदान केलेल्या अधिकाराचा गैरवापर करीत असल्याचे निदर्शनास आल्यास अधिकार काढून घेतले जातील व कायदेशीर कारवाई करण्यात येतील.

६. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्र. १९४२/२०१३ दि. बेसन कॅथॉलीक को ऑपरेटिव्ह बँक विरुध्द महाराष्ट्र राज्य व इतर याचिकेमध्ये दिनांक ०५ डिसेंबर २०१५ रोजी दिलेल्या आदेश विचारात घेऊन वसूलीची कार्यवाही करतांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ अन्वये प्राप्त असलेल्या अधिकारनुसारच वसुलीची कार्यवाही करावी.

७. वसूली अधिकाऱ्यास त्याच्या नांवापुढे कोठेही महाराष्ट्र शासन नियुक्त आणि कोर्ट किंवा एक्झीक्युटीव्ह कोर्ट या शब्दाचा अथवा तत्सम शब्दांचा वापर करता येणार नाही. त्याऐवजी वसुली अधिकाऱ्यांनी त्यांच्या नांवापुढे वसुली अधिकारी (महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ चे नियम १०७ अनवये) असे लिहावे.

८. नियमाप्रमाणे अधिकार (सरचार्ज) वसूल करुन संस्था स्तरावर त्यांची स्वतंत्र नोंदवही ठेवून जमा झालेल्या सरचार्ज ज्या त्या वेळी शासकीय कोषागारात भरणा करुन केलेल्या चलनाच्या प्रतीसह अहवाल दरमहा या कार्यालयास सादर करावा.

९. शासन निर्णय क्र. संकिर्ण -१५०४/प्र. क्र. २३१/१५-स दिनांक २३/११/२००६ अन्वये विशेष वसुली अधिकाऱ्यांना सिंहाच्या राजमुद्रेचा वापर करणेस मनाई आहे.

१०. संस्थेची मागणी व थकबाकी वसुली अभावी संस्थेस येणारी अडचण याबाबी लक्षात घेवून थकबाकी वसूली होण्याच्या दृष्टीकोनातून संस्थेने प्रस्तावातील केलेल्या मागणीस अनुसरुन सदरचे अधिकार प्रदान करणे येत असून होणारा सरचार्ज चलनाचा भरणा संस्थेचे मुख्यालय ज्या ठिकाणी असेल तेथील संबंधीत निबंधक कार्यालयामार्फत तपासणी करुन शासकीय कोषागारात जमा करण्यात यावा.

११. विशेष वसुली अकिारी यांनी थकबाकीदाराकडून प्रमाणपत्रानुसार होणारी रक्कम व अधिभार याशिवाय इतर कोणताही खर्च वसुल करण्यात येवू नये.

१२. जप्त केलेल्या मालमत्तेचा ताबा विक्री प्रमाणपत्र दिल्यानंतरच लिलाव खरेदीदारास देण्यात येईल. तोपर्यंत मालमत्ता केवळ जप्त करण्यात येईल व ही जप्ती जारी ठेवतांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्याखालील नियमांचे पालन होणे आवश्यक आहे. या काळात कर्जदारांस अशा मालमत्तेच्या ताब्यापासून वंचित ठेवता येणार नाही.

तसेच मा. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे यांचे आदेश दिनांक ६/०४/२०१८ अन्वये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व त्याखालील नियम १०७ अन्वये वसुली अधिकाऱ्यांनी वसूल करावयाच्या हुकुमनाम्याच्या/वसुली दाखल्याच्या आदेशीकेचा खर्च (Cost of process) खालीलप्रमाणे निश्चित केलेला आहे.

अ. क्र.	वसुलीचे टप्पे	आदेशीकेचा खर्च
१.	वसूली दाखला/हुकूमनामा प्राप्त झाल्यानंतर आणि मागणी नोटीस दिल्यानंतर जप्ती नोटीस देण्यापुर्वी	एकुण वसुलपात्र रकमेच्या ०.५०%
२.	जप्ती नोटीस दिल्यानंतर व जप्ती केल्यानंतर	एकुण वसूलपात्र रकमेच्या ०.७५%
३.	लिलाव जाहीर करुन जंगम/स्थावर मालमत्तेच्या लिलावास मान्यता मिळाल्यानंतर	एकुण वसूलपात्र रकमेच्या १.५०%

अटी व शर्ती :-

१) वसुली अधिकारी यांना हुकूमनामा/वसुली दाखला यामधील वसूलपात्र रक्कम व उपरोक्त नमुद हुकूमनाम्याच्या/वसुली दाखल्याच्या आदेशीकेचा खर्च (Cost of process) या व्यतीरिक्त इतर कोणतीही रक्कम वसुली खर्च म्हणून थकबाकीदाराकडून वसुल करता येणार नाही.

२) लिलावाद्वारे मालमत्ता विक्री केल्यानंतर कमाल १.५०% दरानेच आदेशीकेचा खर्च वसुल करता येईल. अन्यथा उपरोक्त नमुद ज्या टप्प्यावर थकबाकी रक्कम पुर्ण वसुल होईल त्या टप्पेनिहाय दरानेच असा खर्च वसूल करावा.

३) उपरोक्त नमुद आदेशाप्रमाणे खर्चाची दराची आकारणी व वसूली संस्थेस एका कर्जदाराकडून जास्तीत जास्त रक्कम रु. १.५० लाख मर्यादेतच आदेशीकेचा खर्च म्हणून रक्कम वसुल करता येईल.

४) उपरोक्त अट क्र १ व ३ मध्ये नमुद केलेल्या रकमे व्यतिरिक्त वसूली अधिकारी यांनी जादा रक्कम वसुल केल्यास ते महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ मधील तरतुदीनुसार कारवाईस पात्र राहतील.

५) प्रस्तुत खर्चाचा वापर वसुली अधिकारी/संस्था यांनी वसूली दाखल्याची अंमलबजावणी करतांना नोटीस फी, पोस्टेज, स्टेशनरी जाहीरात खर्च व प्रवास खर्च यासाठीच करावयाचा आहे. या व्यतिरिक्त इतर कोणत्याही कारणासाठी खर्च करता येणार नाही.

६) संस्थेने याप्रमाणे वसुल केलेल्या खर्चाबाबत व त्यांच्या विनियोगाबाबत प्रकरण निहाय हिशोब ठेवणे बंधनकारक राहील. संस्थेच्या वैधानिक लेखापरिक्षकांने लेखापरिक्षण करतांना खर्चाची आकारणी व त्याचा विनियोग योग्य पध्दतीने केला आहे. किंवा नाही याबाबत तपासणीकरुन त्याबाबतचे निष्कर्ष लेखापरिक्षण अहवालामध्ये करणे बंधनकारक राहील. लेखापरिक्षण अहवालामध्ये याबाबत गंभीर दोष निदर्शनास आल्यास संबंधीत संस्थेच्या निबंधकाने आवश्यक ती कायदेशीर कार्यवाही करावयाची आहे.

लातूर, ३१ जुलै, २०२०.

समृत जाधव,
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, लातूर.

३

जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था परभणी यांजकडून

वाचा :- १. मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था म. रा. पुणे-१ यांचे आदेश जा. क्र. पतसंस्था/स.आ.-खर्च वसुली आदेश/२०१८ दिनांक ६/४/२०१८.

२. मा. सहकार आयुक्त कार्यालयाचे परिपत्रक जा. क्र. पतसंस्था/स.आ.-५/वसुली अधिकारी नियुक्ती /फेरनियुक्ती/ दिनांक २०१८ दि. ३१/१०/२०१८.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, सोनपेठ नागरी सहकारी बँक लि. सोनपेठ यांचे पत्र जा. क्र. १५०६ दिनांक ८/०९/२०२०.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ अन्वये

आदेश

क्र. जिउनि/कलम १५६/अधिकार/सोनपेठ बँक/२०९२/२०२०.– महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन **मी, एम.बी. सुरवसे, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, परभणी** या आदेशान्वये **सोनपेठ नागरी सहकारी बँक लि. सोनपेठ जि. परभणी** या संस्थेच्या खालील अधिकाऱ्यांना त्यांच्या नावापुढे दर्शविलेल्या कार्यक्षेत्रासाठी कलम १०१ व कलम ९८ अन्वये प्राप्त झालेल्या वसुली प्रमाणपत्राची अंमलबजावणी बाबत करावयाच्या कार्यवाहीपुरती महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ अन्वये व नियम १९६१ चे नियम १०७ मधील तरतुदीनुसार, खालील अटीस अधिन राहून या आदेशाच्या दिनांकापासून १५/९/२०२० ते ३१/३/२०२१ नियम कालावधी करीता प्रदान करीत आहे.

अ. क्र.	अधिकार प्रदान केलेल्या अधिकाऱ्याचे नाव	अधिकार प्रदान केलेल्या अधिकाऱ्यांचा हुद्दा	शक्तीची व्याप्ती	कार्यक्षेत्र
१.	श्री. एन.पी. गौड	मुख्य कार्यकारी अधिकारी	विशेष वसूली व विक्री अधिकारी	ता. सोनपेठ

अटी :-

१) प्रतिमाह विहीत नमुन्यात वसुलीची माहिती या कार्यालयास सादर करावी.

२) सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था ता. सोनपेठ यांनी वेळोवळी वसुलीची माहीती व आढावा घ्यावा.

३) सदरचे अधिकार सहकार कायदा कलम १०१ व कलम ९८ अन्वये प्राप्त वसूली दाखल्याची अंमलबजावणी करण्याकरिता असतील.

४) थकीत सरचार्जची रक्कम १५ दिवसांचे आंत शासकीय कोषागारात भरणा करावी व चलनाची प्रत या कार्यालयास तात्काळ सादर करावी.

५) प्रस्तुत प्राधिकृत वसूली अधिकाऱ्याची बदली/सेवानिवृत्ती/मृत्यु झाल्यास प्रदान केलेले अधिकार आपोआप संपुष्टात येतील आथवा बँक व्यवस्थापनाने अधिकार काढून घेण्याबाबत प्रस्ताव सादर केल्यास प्रदान केलेले अधिकार काढून घेण्यात येतील.

६) वसुली अधिकारी यांनी नमुद केलेल्या कालावधीत वसुलीचे कामकाज समाधानकारक केले नसल्याचे निदर्शनास आल्यास किंवा प्रदान केलेल्या अधिकाराचा गैरवापर करीत असल्याचे निदर्शनास आल्यास प्रदान केलेले अधिकार काढून घेतले जातील व भविष्यात असे कोणतेही अधिकार अशा व्यक्तीस प्रदान करण्यात येणार नाहीत.

७) आपले पत्रव्यवहारात /आदेशात तीन सिंहाची राजमुद्रेचा वापर करता येणार नाही, त्याऐवजी मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्यालयीन परिपत्रक दिनांक ६/६/२०१९ मध्ये निश्चित केलेल्या बँकेच्या नावाच्या मोहरेचा वापर करण्यात यावा.

८) मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे परिपत्रक क्र. प्रशा/व.अ./जप्त मा./कब्जाबंदी ०९ दिनांक २०/३/२००९ अन्वये सहकारी बँक व पतसंस्थांच्या विशेष वसुली अधिकारी यांनी जप्त केलेल्या मालमत्तेचा कर्जदाराकडील ताबा जोपर्यंत अशी मालमत्ता सार्वजनिक लिलावात विकली जाणार नाही तो पर्यंत घेवू नये.

९) वसूली अधिकाऱ्यास त्याच्या नावापुढे कोठेही **"महाराष्ट्र शासन नियुक्त"** आणि किंवा **"सिव्हील कोर्ट"** किंवा **"एक्झीक्युटीव्ह कोर्ट" या शब्दांचा अथवा तत्सम शब्दांचा वापर करता येणार नाही.** त्या ऐवजी वसुली अधिकाऱ्यांनी त्यांच्या नावापुढे "वसुली अधिकारी **(महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व १९६१ चे नियम १०७ अन्वये)**" असे लिहावे.

१०) वसूली अधिकाऱ्यास थकबाकीदाराकडून वसूली दाखल्यानुसार वसूलपात्र रक्कम व मा. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था म. रा. पुणे यांचे कार्यालयाचे कलम १५६ आणि त्या खालील नियम १०७ अन्वये आदेश दिनांक ६/४/२०१८ मध्ये नमुद केलेप्रमाणे व दराने अंमलबजावणी खर्चाची रक्कम याशिवाय इतर कोणतीही रक्कम वसुल करता येणार नाही.

११) मा. उच्च न्यायालय मुंबई रिट याचिका क्रमांक १९४२/२०१३ दि बेसिन काथोलीक को-ऑप बँक विरुध्द महाराष्ट्र राज्य इतर या याचिकेमध्ये दिनांक ५ डिसेंबर २०१५ रोजी दिलेल्या आदेश विचारात घेवून वसूली करण्यात यावी.

१२) आहे त्या आस्थापनेवरील आहरण व संवितरण अधिकारी /पगार करणारा अधिकारी यांचे मार्फत पगारातून कर्ज वसूल करण्याची कार्यवाही करावी.

१३) वसूली अधिकारी यांनी निर्गमीत करावयाच्या नोटीस/आदेश/ घोषणा यामध्ये त्यांना अधिकार प्रदान केलेल्या या आदेशाच्या संदर्भ नमूद करावा.

परभणी, १५ सप्टेंबर, २०२०.

एम.बी. सुरवसे,
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, परभणी

४

सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था हिंगोली यांजकडून

अधिसुचना

क्र. एचएलआय/एचएलआय/एचएसजी/४७४/७७३/२०२०-२१/२०२० . :- मी, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,ता. हिंगोली याद्वारे अधिसुचना करीत आहे की, **कृष्णा गृहनिर्माण सहकारी संस्था म. सावरखेडा ता. जि. हिंगोली** ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ९ (१) अन्वये नोंदविण्यात आली असून तिचा नोंदणी क्रमांक **एचएलआय/एचएलआय/एचएसजी/७७३/२०२०-२१/२०२०,** दि. १४/०८/२०२० असा आहे.

उक्त अधिनियमाचे कलम १२ (१) व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ चे नियम १० (१) अनवये तिचे वर्गीकरण **''गृहनिर्माण संस्था''** असुन उपवर्गीकरण **''भाडेकरु मालकी हक्क गृहनिर्माण संस्था''** असे आहे.

हिंगोली, १४ ऑगस्ट, २०२०.

के.बी. फिसके,
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, ता. हिंगोली.

५

जिल्हाधिकारी यांजकडून

अधिसूचना (कलम-१९)

भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना उचित नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम - २०१३

क्र.२०१९/आरबी/डेस्क-३/भूसं/सिआर-११६.— क्र.२०१९/भूसंपादन/सि.सा.त./बोधडी बु./सिआर-११, ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या नांदेड जिल्ह्याच्या जिल्हाधिका-याने, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश ''उक्त अधिनियम'' असा केला आहे.) याच्या कलम ११ च्या पोट कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन, **अधिसुचना क्रमांक-३५, दिनांक १३-१९ फेब्रुवारी, २०२०** अन्वये प्रारंभिक अधिसुचना काढली आहे. आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये आधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची दोन मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी **कार्यकारी अभियंता, विष्णुपूरी प्रकल्प विभाग क्र.२ नांदेड** विभागाच्या खर्चाने करण्याची आवश्यकता आहे.

आणि ज्याअर्थी, नांदेड (जिल्ह्याच्या) जिल्हाधिका-याने, कलम १५ च्या पोटकलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादीत करण्याची आवश्यक्ता आहे याबाबत त्याची खात्री पटली आहे; आणि म्हणुन, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट कलम (१) च्या तरतुदीन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे;

आणि ज्याआर्थी, आनुसूची तीन मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी ''पुनर्वसाहत क्षेत्र'' म्हणुन निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी **उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, किनवट** यास पदनिर्देशित करीत आहे.

अनुसूची एक

संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन

गावाचे नांवः मौ.बोधडी (बु.) तालुकाः किनवट जिल्हाः नांदेड

अ.क्र.	**भूमापन क्रमांक किंवा गट नंबर**	**क्षेत्र (हे.आर. मध्ये)**	**सोडुन देण्यात आलेले जमीनीचे आदमासे क्षेत्र हे.आर.**
०१	१७९	०.०२	-
	एकूण	०.०२	-

अनुसूची दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नांवः- भूसंपादन प्रस्ताव- सिंदगी साठवण तलाव ता. किनवट जि. नांदेड बुडीत क्षेत्रासाठी लागणा-या अतिरिक्त जमीनीचा भूंसपादन प्रस्ताव.

प्रकल्पाच्या कामाचे वर्णनः- भूसंपादन प्रस्ताव- सिंदगी साठवण तलाव ता. किनवट जि. नांदेड बुडीत क्षेत्रासाठी लागणा-या अतिरिक्त जमीनीचा भूंसपादन प्रस्ताव.

समाजाला होणारे लाभः- सिंचनाखालील क्षेत्र वाढेल व नविन भूसंपादन कायद्यानुसार होणा-या लाभाचा फायदा मिळेल.

अनुसूची तीन

पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन

गावाचे नांवः मौ. बोधडी (बु.), तालुकाः किनवट जिल्हाः नांदेड

अनु क्र.	भूमापन क्र. किंवा गट नं.	क्षेत्र हेक्टर मध्ये
-	- लागु नाही -	——

अनुसूची - चार

(पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)

- लागु नाही -

टिप - उक्त जमिनीच्या नकाशाचे निरीक्षण **उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, किनवट** यांचे कार्यालयात करता येईल.

दिनांकः- ०५/०८/२०२०

ठिकाणः नांदेड

स्वा/-
जिल्हाधिकारी, नांदेड.

६

जिल्हा न्यायाधीश यांजकडून

वाचले :- श्री पी.सी. बारटक्के, सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, देगलूर यांचे पत्र क्र. ६२५/२०२०. दिनांक १७/०३/२०२० सोबत विहीत नमुन्यातील अर्जित रजा मिळणे बाबतचा अर्ज व त्यावरील आदेश.

आदेश

क्र. ब-२(१)/२११३/२०२०:- श्री पी.सी. बारटक्के, सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, देगलूर यांना महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम ५० अन्वये दि. १८/०३/२०२० ते २१/०३/२०२० या एकुण (०४) अर्जित रजा, रजेच्या पुढे दिनांक २२/०३/२०२० रोजीचा सुट्टीचा फायदा जोडून, दिनांक १७/०३/२०२० रोजीच्या कार्यालयीन वेळेनंतर ते दिनांक २३/०३/२०२० रोजीच्या कार्यालयीन वेळेपुर्वीपर्यंत मुख्यालय सोडण्याच्या परवानगीसह मंजूर केली आहे.

रजेवरून परत आल्यानंतर श्री पी.सी. बारटक्के, सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, देगलूर हे पुर्वीप्रमाणे त्याच पदावर स्थानापन्न राहतील.

महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ च्या नियम ३९-ब खालील तळटिप-२ अन्वये प्रमाणित करण्यात येते की, श्री पी.सी. बारटक्के, सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, देगलूर हे जर वर नमूद कालावधीत रजेवर गेले नसते तर ते त्याच पदावर स्थानापन्न राहिले असते.

:०२:

श्री पी.सी. बारटक्के, सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, देगलूर यांच्या उपरोक्त रजेच्या कालावधीत त्यांच्या न्यायालयाचे जरुरी व तात्कालीक कामकाज श्री एस.जी. बरडे, दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, देगलूर यांनी पाहिला आहे.

नांदेड, १८ मार्च, २०२०.

एस.एस. खरात,
जिल्हा न्यायाधीश-१, नांदेड.

७

जिल्हा न्यायाधीश यांजकडून

वाचले :- श्री एम.एस. शेख, जिल्हा न्यायाधीश-१, भोकर नांदेड यांचे पत्र क्र. २५५/२०२०. दिनांक १९/०३/२०२० सोबत विहीत नमुन्यातील अर्जित रजेचा अर्ज व त्यावरील आदेश.

आदेश

क्र. ब-२(१)/२१७१/२०२०:- श्री एम.एस. शेख, जिल्हा न्यायाधीश-१, भोकर यांना महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम ५० अन्वये दि. २०/०३/२०२० व २१/०३/२०२० या एकुण (०२) दिवसांची अर्जित रजा रजेच्या पुढे दिनांक २२/०३/२०२० रोजीचा सुट्टीचा फायदा जोडून, दिनांक १९/०३/२०२० रोजीच्या कार्यालयीन वेळेनंतर ते दिनांक २३/०३/२०२० रोजीच्या कार्यालयीन वेळेपुर्वीपर्यंत मुख्यालय सोडण्याच्या परवानगीसह मंजूर करण्यात येते.

रजेवरून परत आल्यानंतर श्री एम.एस. शेख, जिल्हा न्यायाधीश-१, भोकर हे पुर्वीप्रमाणे त्याच पदावर स्थानापन्न राहतील.

महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ च्या नियम ३९-ब खालील तळटिप-२ अन्वये प्रमाणित करण्यात येते की, श्री एम.एस. शेख, जिल्हा न्यायाधीश-१, भोकर हे जर वर नमूद कालावधीत रजेवर गेले नसते तर ते त्याच पदावर स्थानापन्न राहिले असते.

:०२:

उपरोक्त कालावधीत श्री एम.एस. शेख, जिल्हा न्यायाधीश-१, भोकर न्यायालयाचा जरुरी व तात्कालीक कार्यभार श्री के.एन. गौतम, जिल्हा न्यायाधीश-२, नांदेड यांनी पहावा.

नांदेड, २० मार्च, २०२०.

दिपक अ. धोळकिया,
प्रमुख जिल्हा न्यायाधीश, नांदेड.

८

जिल्हा न्यायाधीश यांजकडून

वाचले :- श्री एस.एन. साळवे, तदर्थ जिल्हा न्यायाधीश-३, नांदेड यांचे पत्र क्र. २१६९/२०२०. दिनांक २१/०३/२०२० सोबत विहीत नमुन्यातील अर्जित रजेचा अर्ज व त्यावरील आदेश.

आदेश

क्र. ब-२(१)/२१९४/२०२०:- श्री एस.एन. साळवे, तदर्थ जिल्हा न्यायाधीश-३, नांदेड यांना महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम ५० अन्वये दि. २३/०३/२०२० ते २७/०३/२०२० पर्यंत (दोन्ही दिवस धरून) या एकूण (०५) दिवसांची अर्जित रजा रजेच्या मागे दिनांक २२/०३/२०२० व रजेच्या पुढे दिनांक २८ व २९/०३/२०२० या एकुण तीन दिवसांचा सुट्टींचा फायदा जोडून, दिनांक २१/०३/२०२० रोजीच्या कार्यालयीन वेळेनंतर ते दिनांक ३०/०३/२०२० रोजीच्या कार्यालयीन वेळेपुर्वीपर्यंत मुख्यालय सोडण्याच्या परवानगीसह मंजूर करण्यात येते.

रजेवरून परत आल्यानंतर श्री एस.एन. साळवे, तदर्थ जिल्हा न्यायाधीश-३, नांदेड हे पुर्वीप्रमाणे त्याच पदावर स्थानापन्न राहतील.

महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ च्या नियम ३९-ब खालील तळटिप-२ अन्वये प्रमाणित करण्यात येते की, श्री एस.एन. साळवे, तदर्थ जिल्हा न्यायाधीश-३, नांदेड हे जर वर नमूद कालावधीत रजेवर गेले नसते तर ते त्याच पदावर स्थानापन्न राहिले असते.

:०२:

उपरोक्त कालावधीत तदर्थ जिल्हा न्यायाधीश-३, नांदेड न्यायालयाचा जरुरी व तात्कालीक कार्यभार श्री डी.आर. देशपांडे, तदर्थ जिल्हा न्यायाधीश-३, नांदेड यांनी पहावा.

नांदेड, २१ मार्च, २०२०.

दिपक अ. धोळकिया,
प्रमुख जिल्हा न्यायाधीश, नांदेड.

९

जिल्हा न्यायाधीश यांजकडून

वाचले :- सौ. सुवर्णा अ. कुलकर्णी, दुसरे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, बिलोली यांचे पत्र क्र. ४३७/२०२०. दिनांक १०/०६/२०२० सोबत विहीत नमुन्यातील अर्जित रजा मिळणे बाबतचा अर्ज व त्यावरील आदेश.

आदेश

क्र. ब-२(१)/२८१०/२०२०:- सौ. सुवर्णा अ. कुलकर्णी, दुसरे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, बिलोली यांना महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम ५० अन्वये दि. १५/०६/२०२० ते १७/०६/२०२० पर्यंत (दोन्ही दिवस धरुन) या एकूण (०३) दिवसांची अर्जित रजा, रजेच्या मागे दिनांक १३/०६/२०२० व १४/०६/२०२० या दोन दिवसांच्या सुट्यांचा फायदा जोडून, दिनांक १२/०६/२०२० रोजीच्या कार्यालयीन वेळेनंतर ते दिनांक १८/०६/२०२० रोजीच्या कार्यालयीन वेळेपुर्वीपर्यंत मुख्यालयाबाहेर करावयाचा प्रवास संबंधीत सक्षम प्राधिकाऱ्याच्या परवानगीने आणि आपल्या स्वतःच्या संपूर्ण जबाबदारीवर तसेच मा. उच्च न्यायालयाच्या दिनांक २२/०५/२०२० रोजीच्या अधिसुचनेतील अटीस अधीन राहून मंजूर करण्यात येते.

रजेवरून परत आल्यानंतर सौ. सुवर्णा अ. कुलकर्णी, दुसरे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, बिलोली ह्या पुर्वीप्रमाणे त्याच पदावर स्थानापन्न राहतील.

महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ च्या नियम ३९-ब खालील तळटिप-२ अन्वये प्रमाणित करण्यात येते की, सौ. सुवर्णा अ. कुलकर्णी, दुसरे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, बिलोली ह्या जर वर नमूद कालावधीत रजेवर गेल्या नसत्या तर त्या त्याच पदावर स्थानापन्न राहिल्या असत्या.

:०२:

सौ. सुवर्णा अ. कुलकर्णी, दुसरे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, बिलोली यांच्या उपरोक्त रजेच्या कालावधीत त्यांच्या न्यायालयाचे जरुरी व तात्कालीक कामकाज श्री आर.आर. पत्की, सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, बिलोली यांनी पहावा.

नांदेड, १० जून, २०२०.

दिपक अ. धोळकिया,
प्रमुख जिल्हा न्यायाधीश, नांदेड.

१०

जिल्हा न्यायाधीश यांजकडून

वाचले :- श्री ल.मु. सय्यद, सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, कंधार यांचे पत्र क्र. ७६९/२०२०. दिनांक १६/०६/२०२० सोबत विहीत नमुन्यातील अर्जित रजा मिळणे बाबतचा अर्ज व त्यावरील आदेश.

आदेश

क्र. ब-२(१)/२८८०/२०२०:- श्री ल.मु. सय्यद, सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, कंधार यांना महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम ५० अन्वये दि. १७/०६/२०२० ते २०/०६/२०२० पर्यंत (दोन्ही दिवस धरुन) या एकूण (०४) दिवसांची अर्जित रजा, रजेच्या पुढे दि. २१/०६/२०२० रोजीचा सुट्टीचा फायदा जोडून, दिनांक १६/०६/२०२० रोजीच्या कार्यालयीन वेळेनंतर ते दिनांक २२/०६/२०२० रोजीच्या कार्यालयीन वेळेपुर्वीपर्यंत मुख्यालयाबाहेर करावयाचा प्रवास संबंधीत सक्षम प्राधिकाऱ्याच्या परवानगीने आणि आपल्या स्वतःच्या संपूर्ण जबाबदारीवर तसेच मा. उच्च न्यायालयाच्या दिनांक २२/०५/२०२० रोजीच्या अधिसुचनेतील अटीस अधीन राहून मंजूर करण्यात येते.

रजेवरून परत आल्यानंतर श्री ल.मु. सय्यद, सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, कंधार हे पुर्वीप्रमाणे त्याच पदावर स्थानापन्न राहतील.

महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ च्या नियम ३९-ब खालील तळटिप-२ अन्वये प्रमाणित करण्यात येते की, श्री ल.मु. सय्यद, सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, कंधार हे जर वर नमूद कालावधीत रजेवर गेले नसते तर ते त्याच पदावर स्थानापन्न राहिले असते.

:०२:

श्री ल.मु. सय्यद, सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, कंधार यांच्या उपरोक्त रजेच्या कालावधीत त्यांच्या न्यायालयाचे जरुरी व तात्कालीक कामकाज श्री एस.डी. तारे, दुसरे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, कंधार यांनी पहावा.

तसेच श्री ल.मु. सय्यद, सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, कंधार यांच्या रजेच्या कालावधीतील अथवा ते कर्तव्यावर रुजू होईपर्यंत सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, कंधार यांच्या आस्थापनेवरील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वेतन देयकांवर तसेच इतर देयकांवर हुंडी, स्वीय प्रपंची लेखे व धनादेश रोखीकृत करुन संबंधीत रक्कम वाटपाचा अधिकार श्री एस.डी. तारे, दुसरे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, कंधार यांना प्रदान करण्यात येत आहे.

नांदेड, १६ जून, २०२०.

दिपक अ. धोळकिया,
प्रमुख जिल्हा न्यायाधीश, नांदेड.

११

जिल्हा न्यायाधीश यांजकडून

वाचले :- श्रीमती एम.बी. कुलकर्णी, पाचवे दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, नांदेड यांचे पत्र दिनांक १५/०६/२०२० व त्यावर दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, नांदेड यांचा पृष्ठांकन क्र. १९२७/२०२०, दि. १५/०६/२०२० व सोबत विहीत नमुन्यातील अर्जित रजेचा अर्ज व त्यावरील आदेश.

आदेश

क्र. ब-२(१)/२८७९/२०२०:- श्रीमती एम.बी. कुलकर्णी, पाचवे सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, नांदेड यांना महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम ५० अन्वये दि. ११/०६/२०२० व १२/०६/२०२० या एकूण (०२) दिवसांची अर्जित रजा, रजेच्या पुढे दिनांक १३/०६/२०२० व १४/०६/२०२० या दोन दिवसांचा सुट्यांचा फायदा जोडून, कार्योत्तर मंजूर करण्यात येते.

रजेवरून परत आल्यानंतर श्रीमती एम.बी. कुलकर्णी, पाचवे सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, नांदेड ह्या पुर्वीप्रमाणे त्याच पदावर स्थानापन्न आहेत.

महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ च्या नियम ३९-ब खालील तळटिप-२ अन्वये प्रमाणित करण्यात येते की, श्रीमती एम.बी. कुलकर्णी, पाचवे सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, नांदेड ह्या जर वर नमूद कालावधीत रजेवर गेल्या नसत्या तर त्या त्याच पदावर स्थानापन्न राहिल्या असत्या.

:भाग - ३:

पाचवे सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, नांदेड यांच्या न्यायालयाचा उपरोक्त कालावधीत जरुरी व तात्कालीक कार्यभार स्थायी आदेशान्वये श्रीमती आदिती आर. नागोरी, चौथे सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, नांदेड यांनी पाहिला आहे.

नांदेड, १६ जून, २०२०.

दिपक अ. धोळकिया,
प्रमुख जिल्हा न्यायाधीश, नांदेड.

१२

जिल्हा न्यायाधीश यांजकडून

वाचले :- श्रीमती एन.एल. गायकवाड, चौथे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, नांदेड यांचे पत्र दिनांक १८/०६/२०२० व त्यावर दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, नांदेड यांचा पृष्ठांकन क्र. १९५७/२०२०, दिनांक १८/०६/२०२० व सोबत विहीत नमुन्यातील अर्जित रजा मिळणे बाबतचा अर्ज व त्यावरील आदेश.

आदेश

क्र. ब-२(१)/२९६५/२०२०:- श्रीमती एन.एल. गायकवाड, चौथे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, नांदेड यांना महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम ५० अन्वये दि. १७/०६/२०२० या (०१) दिवसांची अर्जित रजा, कार्योत्तर मंजूर करण्यात येते.

रजेवरून परत आल्यानंतर श्रीमती एन.एल. गायकवाड, चौथे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, नांदेड ह्या पुर्वीप्रमाणे त्याच पदावर स्थानापन्न आहेत.

महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ च्या नियम ३९-ब खालील तळटिप-२ अन्वये प्रमाणित करण्यात येते की, श्रीमती एन.एल. गायकवाड, चौथे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, नांदेड ह्या जर वर नमूद कालावधीत रजेवर गेल्या नसत्या तर त्या त्याच पदावर स्थानापन्न राहिल्या असत्या.

:भाग - ३:

श्रीमती एन.एल. गायकवाड, चौथे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, नांदेड यांच्या उपरोक्त रजेच्या कालावधीत त्यांच्या न्यायालयाचे जरुरी व तात्कालीक कामकाज स्थायी आदेशान्वये श्रीमती बी.एम.एन. देशमुख, पाचवे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, नांदेड यांनी पाहिला आहे.

नांदेड, १९ जून, २०२०.

एस.एस. खरात,
जिल्हा न्यायाधीश-१, नांदेड.

१३

जिल्हा न्यायाधीश यांजकडून

वाचले :- श्रीमती ए.आर. नागोरी, चौथे सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, नांदेड यांचे पत्र दिनांक २२/०६/२०२० त्यावर दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, नांदेड यांचा पृष्ठांकन क्र. १९७३/२०२०, दिनांक २२/०६/२०२० व सोबत विहीत नमुन्यातील अर्जित रजा मिळणे बाबतचा अर्ज व त्यावरील आदेश.

आदेश

क्र. ब-२(१)/३००६/२०२०:- श्रीमती ए.आर. नागोरी, चौथे सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, नांदेड यांना महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम ५० अन्वये दिनांक २४/०६/२०२० ते २६/०६/२०२० पर्यंत (दोन्ही दिवस धरुन) या एकूण (०३) दिवसांची अर्जित रजा, रजेच्या पुढे दिनांक २७/०६/२०२० व २८/०६/२०२० या दोन दिवसांचा सुट्टीचा फायदा जोडून, दिनांक २३/०६/२०२० रोजीच्या कार्यालयीन वेळेनंतर ते दिनांक २९/०६/२०२० रोजीच्या कार्यालयीन वेळेपुर्वीपर्यंत मुख्यालयाबाहेर करावयाचा प्रवास संबंधीत सक्षम प्राधिकऱ्याच्या परवानगीने आणि आपल्या स्वतःच्या संपूर्ण जबाबदारीवर तसेच मा. उच्च न्यायालयाच्या दिनांक २२/०५/२०२० रोजीच्या अधिसुचनेतील अटीस अधीन राहून मंजूर करण्यात येते.

रजेवरून परत आल्यानंतर श्रीमती ए.आर. नागोरी, चौथे सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, नांदेड ह्या पुर्वीप्रमाणे त्याच पदावर स्थानापन्न आहेत.

महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ च्या नियम ३९-ब खालील तळटिप-२ अन्वये प्रमाणित करण्यात येते की, श्रीमती ए.आर. नागोरी, चौथे सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, नांदेड ह्या जर वर नमूद कालावधीत रजेवर गेल्या नसत्या तर त्या त्याच पदावर स्थानापन्न राहिल्या असते.

:भाग - ३:

श्रीमती ए.आर. नागोरी, चौथे सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, नांदेड यांच्या उपरोक्त रजेच्या कालावधीत त्यांच्या न्यायालयाचे जरुरी व तात्कालीक कामकाज श्रीमती एम.बी. कुलकर्णी, पाचवे सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, नांदेड यांनी पहावा.

नांदेड, २३ जून, २०२०.

एस.एस. खरात,
जिल्हा न्यायाधीश-१, नांदेड.

१४

जिल्हा न्यायाधीश यांजकडून

वाचले :- श्री एस.डी. तारे, दुसरे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, कंधार यांचे पत्र क्र. ७८७/२०२०. दिनांक २२/०६/२०२० सोबत विहीत नमुन्यातील अर्जित रजा मिळणे बाबतचा अर्ज व त्यावरील आदेश.

आदेश

क्र. ब-२(१)/३००५/२०२०:- श्री एस.डी. तारे, दुसरे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, कंधार यांना महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम ५० अन्वये दि. २४/०३/२०२० ते २६/०६/२०२० पर्यंत (दोन्ही दिवस धरून) या एकूण (०३) दिवसांची अर्जित रजा रजेच्या पुढे दिनांक २७/०६/२०२० व २८/०६/२०२० या दोन दिवसांचा सुट्टींचा फायदा जोडून, दिनांक २३/०६/२०२० रोजीच्या कार्यालयीन वेळेनंतर ते दिनांक २९/०६/२०२० रोजीच्या कार्यालयीन वेळेपुर्वीपर्यंत मुख्यालयाबाहेर करावयाच्या प्रवास संबंधीत सक्षम प्राधिकाऱ्याच्या परवानगीने आणि आपल्या स्वतःच्या संपुर्ण जबाबदारीवर तसेच मा. उच्च न्यायालयाच्या दिनांक २२/०५/२०२० रोजीच्या अधिसुचनेतील अटीस अधीन मंजूर करण्यात येते.

रजेवरून परत आल्यानंतर श्री एस.डी. तारे, दुसरे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, कंधार हे पुर्वीप्रमाणे त्याच पदावर स्थानापन्न राहतील.

महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ च्या नियम ३९-ब खालील तळटिप-२ अन्वये प्रमाणित करण्यात येते की, श्री एस.डी. तारे, दुसरे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, कंधार हे जर वर नमूद कालावधीत रजेवर गेले नसते तर ते त्याच पदावर स्थानापन्न राहिले असते.

:०२:

श्री एस.डी. तारे, दुसरे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, कंधार यांच्या उपरोक्त रजेच्या कालावधीत त्यांच्या न्यायालयाचे जरुरी व तात्कालीक कामकाज श्री ल.मु. सय्यद, सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, कंधार यांनी पहावा.

नांदेड, २३ जून, २०२०.

एस.एस. खरात,
जिल्हा न्यायाधीश-१, नांदेड.

१५

जिल्हा न्यायाधीश यांजकडून

वाचले :- श्रीमती एन.एल. गायकवाड, चौथे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, नांदेड यांचे पत्र दिनांक २२/०६/२०२० व त्यावर दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, नांदेड यांचा पृष्ठांकन क्र. १९७४/२०२०, दिनांक २२/०६/२०२० सोबत विहीत नमुन्यातील अर्जित रजा मिळणे बाबतचा अर्ज व त्यावरील आदेश.

आदेश

क्र. ब-२(१)/३००७/२०२०:- श्रीमती एन.एल. गायकवाड, चौथे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, नांदेड यांना महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम ५० अन्वये दि. १९/०६/२०२० व २०/०६/२०२० या एकूण (०२) दिवसांची अर्जित रजा, कार्योत्तर मंजूर करण्यात येते.

रजेवरून परत आल्यानंतर श्रीमती एन.एल. गायकवाड, चौथे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, नांदेड ह्या पुर्वीप्रमाणे त्याच पदावर स्थानापन्न आहेत.

महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ च्या नियम ३९-ब खालील तळटिप-२ अन्वये प्रमाणित करण्यात येते की, श्रीमती एन.एल. गायकवाड, चौथे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, नांदेड ह्या जर वर नमूद कालावधीत रजेवर गेल्या नसत्या तर त्या त्याच पदावर स्थानापन्न राहिल्या असत्या.

:भाग - ३:

श्रीमती एन.एल. गायकवाड, चौथे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, नांदेड यांच्या उपरोक्त रजेच्या कालावधीत त्यांच्या न्यायालयाचे जरुरी व तात्कालीक कामकाज स्थायी आदेशान्वये श्रीमती बी.एम.एन. देशमुख, पाचवे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, नांदेड यांनी पाहिला आहे.

नांदेड, २३ जून, २०२०.

एस.एस. खरात,
जिल्हा न्यायाधीश-१, नांदेड.

१६

जिल्हा न्यायाधीश यांजकडून

वाचले :- श्री पी.जी. तापडीया, दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, माहूर यांचे पत्र क्र. ५२७/२०२०. दिनांक ०३/०६/२०२० सोबत विहीत नमुन्यातील अर्जित रजा मिळणे बाबतचा अर्ज व त्यावरील आदेश.

आदेश

क्र. ब-२(१)/२६२६/२०२०:- श्री पी.जी. तापडीया, दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, माहूर यांना महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम ५० अन्वये दि. ०४/०६/२०२० ते ०६/०६/२०२० पर्यंत (दोन्ही दिवस धरून) या एकूण (०३) दिवसांची अर्जित रजा, रजेच्या पुढे दिनांक ७/०६/२०२० रोजीचा सुट्टींचा फायदा जोडून, दिनांक ०३/०६/२०२० रोजीच्या कार्यालयीन वेळेनंतर ते दिनांक ८/०६/२०२० रोजीच्या कार्यालयीन वेळेपुर्वीपर्यंत मुख्यालयाबाहेर करावयाच्या प्रवास संबंधीत सक्षम प्राधिकाऱ्याच्या परवानगीने आणि आपल्या स्वतःच्या संपुर्ण जबाबदारीवर करण्याच्या अटीस अधीन राहून मंजूर करण्यात येते.

रजेवरून परत आल्यानंतर श्री पी.जी. तापडीया, दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, माहूर हे पुर्वीप्रमाणे त्याच पदावर स्थानापन्न राहतील.

महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ च्या नियम ३९-ब खालील तळटिप-२ अन्वये प्रमाणित करण्यात येते की, श्री पी.जी. तापडीया, दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, माहूर हे जर वर नमूद कालावधीत रजेवर गेले नसते तर ते त्याच पदावर स्थानापन्न राहिले असते.

:०२:

श्री पी.जी. तापडीया, दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, माहूर यांच्या उपरोक्त रजेच्या कालावधीत त्यांच्या न्यायालयाचे जरुरी व तात्कालीक कामकाज श्री जे.एन. जाधव, सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, किनवट यांनी पहावा असा आदेश झाला आहे.

नांदेड, ३ जून, २०२०.

दिपक अ. धोळकिया,
प्रमुख जिल्हा न्यायाधीश, नांदेड.

१७

जिल्हा न्यायाधीश यांजकडून

वाचले :- श्री ए.आर धामेचा, अति.सह जिल्हा न्यायाधीश, नांदेड यांचे पत्र दिनांक २१/०३/२०२० व दिनांक २६/०६/२०२० रोजी सादर केलेला विहीत नमुन्यातील अर्जित रजेचा अर्ज त्यावरील आदेश.

आदेश

क्र. ब-२(१)/३०६१/२०२०:- श्री ए.आर धामेचा, अति. सह जिल्हा न्यायाधीश, नांदेड यांना महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम ५० अन्वये दि. २३/०३/२०२० व २४/०३/२०२० या एकूण (०२) दिवसांची अर्जित रजा, रजेच्या पुर्वी दिनांक २२/०३/२०२० व २५/०३/२०२० या दोन दिवसांचा सुट्टयांचा फायदा जोडून, दिनांक २१/०३/२०२० रोजीच्या कार्यालयीन वेळेनंतर पासून मुख्यालय सोडण्याच्या परवानगीसह कार्योत्तर मंजूर करण्यात येते.

रजेवरून परत आल्यानंतर श्री ए.आर धामेचा, अति. सह जिल्हा न्यायाधीश, नांदेड हे पुर्वीप्रमाणे त्याच पदावर स्थानापन्न राहतील.

महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ च्या नियम ३९-ब खालील तळटिप-२ अन्वये प्रमाणित करण्यात येते की, श्री ए.आर धामेचा, अति. सह जिल्हा न्यायाधीश, नांदेड हे जर वर नमूद कालावधीत रजेवर गेले नसते तर ते त्याच पदावर स्थानापन्न राहिले असते.

:०२:

उपरोक्त रजेच्या कालावधीतील श्री ए.आर धामेचा, अति. सह जिल्हा न्यायाधीश, नांदेड यांच्या न्यायालयाचा जरुरी व तात्कालीक कार्यभार स्थायी आदेशान्वये श्री एन.डी.खोसे, तदर्थ जिल्हा न्यायाधीश-१, नांदेड यांनी पाहिला आहे.

नांदेड, २८ जून, २०२०.

दिपक अ. धोळकिया,
प्रमुख जिल्हा न्यायाधीश, नांदेड.

१८

प्रमुख जिल्हा न्यायाधीश यांजकडून

पहा :- १. जिल्हा न्यायालय आदेश क्र. काव्यावि/(प्रशा)/९९१/२०२०, दिनांक १५ फेब्रुरवारी, २०२०.

२. श्री. जे. के. जोशी, दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, उस्मानाबाद यांचा परिवर्तीत रजेबाबतचा दिनांक १८ फेब्रुवारी २०२० रोजी प्राप्त ई-मेल संदेश.

३. श्री. जे. के. जोशी, दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, उस्मानाबाद यांचे पत्र जा. क्र. ११५०/२०२०, दिनांक २० फेब्रुवारी २०२० अन्वये सादर केलेल्या विहित नमुन्यातील परिवर्तीत रजेचा अर्ज.

(सोबत- वैद्यकीय अस्वास्थ प्रमाणपत्र.)

४. श्री. जे. के. जोशी, दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, उस्मानाबाद यांनी दिनांक २४ फेब्रुवारी २०२० रोजी सादस केलेले विहित नमुन्यातील मुळ वैद्यकीय अस्वास्थ व स्वास्थ प्रमाणपत्र.

प्रमुख जिल्हा न्यायाधीश, उस्मानाबाद हे खालील प्रमाणे आदेश निर्गमीत करितात

आदेश

क्र.काव्यावि/(प्रशा)/११२०/२०२०. - श्री. जे. के. जोशी, दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, उस्मानाबाद यांची दिनांक १७ व १८ फेब्रुवारी, २०२० या (०२) दोन दिवसांची वैद्यकीय कारणावरुन परिवर्तीत रजा महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१, मधील नियम-६१, नुसार (रजेपुढील दिनांक १९ फेब्रुवारी, २०२० या एक दिवसाच्या सुट्टीच्या फायद्यासह) कार्योत्तर मंजूर करण्यात येते.

रजेवरून परत आल्यानंतर श्री. जे. के. जोशी, हे दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, उस्मानाबाद म्हणून काम पहात आहेत.

जर श्री. जे. के. जोशी, हे सदरील रजेवर गेले नसते तर ते दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, उस्मानाबाद म्हणून कार्यरत राहिले असते.

(दोन)

श्री. जे. के. जोशी, हे दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, उस्मानाबाद यांच्या न्यायालयाचा दिनांक १७ व १८ फेब्रुवारी, २०२० रोजीचा कार्यभार हा सौ. यु. व्ही. इंदापुरे, सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, व अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, उस्मानाबाद यांनी आणि दिनांक १९ फेब्रुवारी, २०२० रोजीचा कार्यभार हा श्री. ए. ए. शिंदे ३ रे दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, व अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, उस्मानाबाद यांनी पाहिला.

उस्मानाबाद, २४ फेब्रुवारी, २०२०.

श्रीमती एस. एम. शिंदे,
प्रमुख जिल्हा न्यायाधीश,उस्मानाबाद.

१९

जिल्हाधिकारी नांदेड यांजकडून

(नगरपरिषद प्रशासन विभाग)

क्रं.2020/नपाप्र/नपनि/का-1/टे-7/सीआर- दिनांक 20/08/2020

वाचा :

1. महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक 13/12/2018.
2. महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक 05/02/2019.
3. नगर विकास विभाग, मुंबई यांचे कडील शासन परिपत्रक संकीर्ण-2016/प्र.क्र.466/नवि-20. दिनांक 21/12/2016
4. श्री केशवराव व्यंकटराव चव्हाण उपाध्यक्ष नगरपरिषद लोहा यांचा राजीनामा दिनांक 14/07/2020
5. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 चे कलम 54
6. अध्यक्ष, नगरपरिषद लोहा यांचा अहवाल दिनांक 31/07/2020
7. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगर अधिनियम, 1965 चे कलम 51-A (4)

आदेश

ज्याअर्थी उक्त वाचा क्रं. 4 अन्वये नगरपरिषद लोहा येथील उपाध्यक्ष यांनी त्यांचे पदाचा राजीनामा दिला आहे. सदर राजीनामा उक्त वाचा क्रं.05 अन्वये मंजूर झालेला आहे. त्यानूसार उक्त वाचा क्रं.3 च्या तरतूदीनूसार पिठासीन अधिकारी तथा अध्यक्ष नगरपरिषद लोहा यांनी, दिनांक 31/07/2020 रोजी आयोजित करण्यात आलेल्या सभेत, उपाध्यक्ष निवडीबाबतचा कार्यवृत्तांत सादर केला आहे.

त्याअर्थी मी डॉ. विपीन इटनकर, जिल्हाधिकारी नांदेड उक्त वाचा क्रं.7 अन्वये तरतूदीनूसार असे जाहिर करतो की, नगरपरिषद लोहा येथे दिनांक 31/07/2020 रोजी आयोजित सभेत खालीलप्रमाणे दर्शविल्यानूसार नगरपरिषदेच्या नावासमोरील उमेदवार उपाध्यक्ष म्हणून निवडून आले आहेत.

अ.क्र.	नगरपरिषदेचे नाव	निवडून आलेल्या उपाध्यक्षाचे नांव
1.	लोहा	शरद नामदेव पवार

नांदेड : 20/08/2020

(डॉ.विपीन इटनकर भा.प्र.से.)
जिल्हाधिकारी नांदेड

पुढील अधिसूचना असाधारण राजपत्र म्हणून खालील दर्शविलेल्या दिनांकास प्रसिध्द झालेले आहे.

सोमवार दिनांक २८ सप्टेंबर, २०२० : आश्विन ६, शके १९४२

२०

जिल्हाधिकारी यांजकडून

Gò/2020/xÉ{ÉÉ/EòÉ´ÉÉ-1/683.– उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, संदर्भ क्र. १ अन्वये जालना नगरपरिषदेतंर्गत नामनिर्देशित सदस्य निवडणूकीचा कार्यक्रम दिनांक १५/०९/२०२० रोजी जाहीर करण्यात आलेला होता. त्याअनुषंगाने सदर निवडीचा कार्यक्रम सदर दिवशी पार पाडण्यात आलेला असून संदर्भ क्र. २ अन्वये मुख्याधिकारी नगरपरिषद जालना यांनी या कार्यालयास सभेच्या इतीवृत्ताची प्रत सादर केलेली आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे उपाध्यक्ष व नामनिर्देशित सदस्य यांची निवड करण्यात आलेली आहे.

उपाध्यक्षाचे नाव

१.	अन्सारी फरहाना अब्दुल रऊफ	ANSARI FARHANA ABDUL RAUF

नामनिर्देशित सदस्याचे नाव

१.	भक्त आत्मानंद रामचंद्र	BHAKT ATMANAND RAMCHANDRA

जालना : २४ सप्टेंबर, २०२०.

रविंद्र बिनवडे,
जिल्हाधिकारी, जालना.

पुढील अधिसूचना असाधारण राजपत्र म्हणून खालील दर्शविलेल्या दिनांकास प्रसिध्द झालेले आहे.

बुधवार दिनांक ३० सप्टेंबर, २०२० : आश्विन ८, शके १९४२

२१

शुध्दी पत्रक

जाहिर सुचना

परभणी शहर महानगर पालिका, परभणी यांचेकडून
महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१)
अन्वये फेरबदल

मनपा/जावक/न रवि/२१९ दिनाक २९/०९/२०२० पभणी शहर महानगर पालिकेने ठरावाचे अनुषंगाने फेरबदलाची जाहिर सुचना

दिनांक २३ ते २९ जानेवारी २०२० चे शासन राजपत्रात प्रसिध्द केली होती. या प्रसिध्द केलेल्या जाहिर नोटीसमध्ये ठराव क्रमांक २३९ दिनांक २९.०९.२०१९ असा उल्लेख झालेला आहे.

त्या ऐचजी ठराव क्रमांक २३९ दिनांक ११.०९.२०१९ असे वाचावे. करिता सदरील शुध्दीपत्रक जनतेच्या अवलोकनार्थ पुर्वीच्या विहीत कालावधीसाठी प्रसिध्द करण्यात येत आहे.

परभणी : २९/०९/२०२०

आयुक्त,
परभणी शहर महानगर पालिका,
परभणी.

Corrigendum

NOTICE

By Authorised Officer Parbhani City Municipal Corporation, Parbhani

(Modification Under Section 37 (1) of Maharashtra Regional & Town Planning Act – 1966)

No. Council Parbhani/TP/219　　Date : 29/09/2020

Municipal Corporation, Parbhani had issued the public notice of modification in the Maharashtra Government Gazette dated 23 to 29 Jan. 2020 wherein resolution No. 239 dated 19.09.2019 was printed. Now this corrigendum is being published for the public that the resolution shall be read as the resolution No. 239 dated 11.09.2019 published in the Government Gazette dated 23 to 29 Jan. 2020 instead of the previous one.

Parbhani : 29/09/2020

Commissioner,
Parbhani City Municipal
Corporation, Parbhani.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR RUPENDRA DINESH MORE. PRINTED AT GOVERNMENT PRESS, PAITHAN ROAD, AURANGABAD-431 005 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR RUPENDRA DINESH MORE.